# प्रेसनोट

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

**जा.क्र./पोउआ/वाह/नियो/ ३५१४/२०२४** **दिनांक -११/०५/२०२४**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने २१४ पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदार संघाचे निवडणुकीचे कामकाज बि.जे. शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाचे मैदानावर सुरु आहे. नमुद ठिकाणावरुन मतदानाचे मतदारयंत्र व साहित्य वाटप करणार आहेत तसेच जमा देखील करणार आहेत. त्याकरिता मोठया प्रमाणावर बसेस व इतर वाहने ही पोलीस आयुक्त कार्यालय ते नेहरु मेमोरियल हॉल दरम्यान येणार असल्याने वाहतुकीत बदल करणे आवश्यक आहे.

त्याकरिता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर बंडगार्डन व लष्कर वाहतुक विभागामध्ये दिनांक १२/०५/२०२४ रोजीचे ००.०१ वा पासुन ते दिनांक १४/०५/२०२४ रोजीचे ०८.०० वा पर्यंत किराड चौक ते नेहरु मेमोरियल हॉल चौक दरम्यान वाहतुकीमध्ये खालीलप्रमाणे बदल करत आहे.

❖ **दि.१२/०५/२०२४ चे ००.०१ ते दि.१४/०५/२०२४ चे ०८.०० वा पर्यंत किराड चौक ते नेहरु चौक दरम्यान सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद.**

**पर्यायी मार्ग** :-

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडवरील नेहरु चौकामधुन किराड चौक मार्गे पुणे स्टेशन, कडे जाणा-या वाहनांनी दोराबजी चौका मधुन ब्लु नाईल चौक, किराड चौक -साधुवासवानी पुतळा चौक मार्गे किंवा ब्लु नाईल चौक, कौन्सील हॉल चौक मार्गे जावे.

२)नेहरु चौक सरळ बोल्हाई चौक मार्गे पुणे स्टेशनकडे जावे.

**२) साधुवासवानी पुतळा ते नेहरू चौक असा प्रवास करणा-या वाहनांसाठी पर्यायी मार्ग.**

१)साधुवासवानी पुतळा चौक –पोस्ट ऑफिस चौक उजवीकडे वळण घेवुन बोल्हाई चौक येथुन इच्छित स्थळी किंवा

२) किराड चौकामधुन डावीकडे वळण घेवुन ब्लु नाईल चौक सरळ इस्कॉन मंदिर चौक उजवीकडे वळण घेवुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे इच्छित स्थळी जावे.

**(रोहिदास पवार)**
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक, पुणे शहर

**प्रति,**

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी**,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - १

**प्रत :-**

**१) सहा.पोलीस आयुक्त, वाहतुक परिमंडळ ३ पुणे शहार**

**२) पोलीस निरिक्षक**, प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) **प्रभारी अधिकरी**, बंडगार्डन ,लष्कर, वाहतुक विभाग ,पुणे शहर.

४) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतुक शाखा पुणे शहर**

२/-सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी. सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर/ ट्विटरवर अपलोड करावी.

५) **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतुक शाखा पुणे शहर**

२/-संबंधित विभागाचे प्रभारी अधिकरी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करून घेवून सादर करावा.

६) **मा.सहाय्यक अभियंता** (ट्रॅफिक प्लॅनिंग), म.न.पा. पुणे.

२/-सदर ठिकाणी वरील निर्बंधाप्रमाणे फलक बसविणेबाबतची कारवाई होणेस विनंती आहे.

**प्रति :- व्यवस्थापक**, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे

२/-सदरचा आदेश राजपत्रात प्रसिध्द करुन त्याच्या ५ प्रती इकडील कार्यालयात पाठविण्याची विनंती आहे.